आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.com




दैनिक

# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक २५४ वा ● गुरुवार दि. २२ फेब्रुवारी २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## सर्वसामान्य मुंबईकरांच्या घराची होणार स्वप्नपूर्ती ;

मुंबई, : राज्य शासनाने पुनर्विकास/स्वयंपुनर्विकासाबाबत घेतलेल्या निर्णयामुळे स्वयंपुनर्विकासासाठी गृहनिर्माण संस्थांना आता बिल्डरांकडे चकरा मारण्याची गरज राहिली नसून बिल्डर त्यांच्याकडे धावत येतील, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. वर्षानुवर्षे घराचे स्वप्न पाहणाऱ्या मुंबईतील मराठी माणसाची स्वप्नपूर्ती होणार, असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिली.

गृहनिर्माण सहकार परिषदेतील स्वयंपुनर्विकास/पुनर्विकासाच्या निर्णयाबाबत अभ्युदयनगर येथे आयोजित कृतज्ञता सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पालकमंत्री दिपक केसरकर, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार सर्वश्री प्रवीण दरेकर, आशिष शेलार आदी उपस्थित होते.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा लातूर जिल्हा दौरा

लातूर (जिमाका): केंद्रीय रस्ते वाहतूक आणि



महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे २३ फेब्रुवारी २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

केंद्रीय मंत्री ना. गडकरी यांचे २३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता लातूर विमानतळावर आगमन होईल. सकाळी ११.०५ वाजता ते हेलिकॉप्टरने अहमदपूर तालुक्यातील रुद्धाकडे प्रयाण करतील. सकाळी ११.५० वाजता अहमदपूर तालुक्यातील भक्तीस्थळ येथे भेट देतील. दुपारी १२.१५ वाजता भक्ती स्थळ येथे आयोजित लातूर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचे उद्घाटन आणि धाराशिव जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांच्या भूमिपूजन सोहळ्यास ते उपस्थित राहतील. दुपारी १.३० वाजता हेलिकॉप्टरने लातूर विमानतळाकडे प्रयाण करतील. दुपारी २ वाजता लातूर येथून विमानाने पुणेकडे प्रयाण करतील.

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा

लातूर (जिमाका): राज्याच्या क्रीडा व युवक



कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे २२ फेब्रुवारी २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे यांचे २२ फेब्रुवारी रोजी सकाळी लातूर येथे आगमन होईल. सकाळी ११ वाजता लातूर शहरातील अंबाजोगाई रोडवरील हॉटेल अतिथी येथे आयोजित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी लातूर शहर व ग्रामीण जिल्हा कार्यकारिणी, पदाधिकारी व फ्रंटल सेलचे प्रमुख यांच्या बैठकीला ते उपस्थित राहतील. दुपारी १ वाजता लातूर येथून मोटारीने उदगीरकडे प्रयाण करतील. दुपारी २.१५ वाजता उदगीर येथील कै. वसंतराव नाईक चौक येथे आयोजित श्री संत सेवालाल महाराज जयंती कार्यक्रमास ते उपस्थित राहतील.

ना. बनसोडे हे दुपारी ४ वाजता उदगीर शहरातील श्रीनगर कॉलनी येथील रघुकुल मंगल कार्यालयाजवळ जगदीश कचरूलाल मुंदडा यांच्या शांतीकुंज निवास गृहप्रवेशास उपस्थित राहतील. सायंकाळी ५.३० वाजता उदगीर तालुक्यातील वाढवणा बुद्रुक येथील श्री. बालाजी काळे यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देतील. सोयीनुसार लातूरकडे प्रयाण करतील. शकुंतला निवासस्थान येथे आगमन व मुक्काम करतील.

### बुलढाणा जिल्ह्यात विषबाधा झालेल्यांना उपचार करून घरी सोडले;आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी वाचविले शेकडो लोकांचे प्राण

मुंबई, : बुलढाणा जिल्हयातील लोणार तालुक्यातील सोमठाणा व खापरखेड येथे अखंड हरिनाम सप्ताहाच्या कार्यक्रमात जेवणातून २०८ जणांना विषबाधा झाल्याची घटना समोर आली होती. विषबाधा झालेल्या सर्वांवर वेळेत उपचार करून त्यांना घरी सोडून देण्यात आले आहे. तर चार रुग्णांना ग्रामीण रुग्णालय बीबी (ता. लोणार) आणि तीन रुग्णांना ग्रामीण रुग्णालय, मेहकर येथे पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी, बुलढाणा यांनी दिली आहे.

या घटनेची माहिती मिळताच नजीकच्या आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स, नर्सेस आणि रुग्णवाहिका प्रत्यक्ष घटनास्थळावर पाठवण्यात आल्या. त्यामुळे जिथे हरिनाम सप्ताह सुरू होतात, त्या विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या आवारात तात्काळ रुग्णांना उपचार पुरविण्यात आले. त्यामुळे कुठलीही जीवितहानी झाली नाही.

विषबाधा झाल्याने उलटी जुलाब होऊन रुग्णाच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे त्यांच्यावर परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जागेवरच उपचार करण्यात आले.

# २३ ते २५ फेब्रुवारी लातुरमध्ये १४ वी न्यूरोसर्जन वैद्यकीय परिषद

**देशातील २२० न्यूरोसर्जन लावणार उपस्थिती तीन दिवसात न्यूरो मधील संशोधनाचे केले जाणार सादरीकरण.**

**मराठवाड्यातील न्यूरोसर्जनना ज्ञान आणि कार्याचा होणार फायदा.**

लातूर – मिडवेस्ट चॅपटर ऑफ न्यूरोलॉजिकल सर्जनस महाराष्ट्र अँड गोआ,एम.सी.एन.एस २०२४ ही राज्यस्तरीय न्यूरोसर्जन वैद्यकीय परिषद लातूर येथील कार्णीवल रिसॉर्ट येथे २३ ते २५ फेब्रुवारी यादरम्यान पार पडणार आहे.देशातील ही १४ वी परिषद असून यंदाचा मान लातूरला मिळाला आहे. देशातील जवळपास २२० न्यूरोसर्जन या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत न्यूरो मधील संशोधनाचे सादरीकरण केले जाणार असून या परिषदेत जेष्ठ व प्रसिध्द न्यूरोसर्जन यांच्या ज्ञान,संशोधन आणि कार्य आणि नवनवीन संशोधनाचा फायदा मराठवाड्यासह राज्यातील न्यूरोसर्जन यांना होणार आहे.याच तीन दिवसात लातूर येथील एम.आय.टी कॉलेज मध्ये कॅडाव्हर्स (मृतदेह) मध्ये प्रॅक्टिकल

**वर्कशॉपचे देखील आयोजन**




करण्यात आले आहे.अशी माहिती या परिषदेचे आयोजन सचिव तथा लातूर येथील सह्याद्री हॉस्पिटलचे प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉक्टर हनुमंत किणीकर यांनी दिली आहे.

आज काल सामान्य व्यक्तीला देखील न्यूरो हा विषय माहिती झालाय, दैनंदिन होत असलेले अपघात आणि कांही विशिष्ठ आरोग्याच्या समस्या पाहता न्यूरोसर्जन हा विषय दररोजचा झालाय अशीच परिस्थिती. सामन्यातील सामान्य व्यक्ती देखील या क्षेत्रापासून अपरिचित नाही हे आजचे वास्तव आहे.

त्यामुळे या क्षेत्रात आज प्रचंड मोठे संशोधन सुरू असून

**देशातील दिग्गज न्यूरोसर्जन**

कायम या क्षेत्रात नवनवीन संशोधन आणि प्रयोग करत असतात.या संशोधनाचा आणि प्रसिद्ध न्यूरोसर्जन यांच्या कार्याचा लाभ महाराष्ट्रातील विशेषतः मराठवाड्यातील न्यूरोसर्जन डॉक्टरांना व्हावा परिणामी त्याचा लाभ,फायदा रुग्णांना व्हावा या उद्देशाने लातूर येथील कार्णीवल रिसॉर्ट येथे २३ ते २५ फेब्रुवारी दरम्यान राज्यस्तरीय १४ व्या न्यूरोसर्जन वैद्यकीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील जवळपास २२० न्यूरोसर्जन या परिषदेत आपला सहभाग नोंदवणार आहेत.ज्यात आपल्या देशातील दिग्गज आणि प्रसिद्ध न्यूरोसर्जन ज्यात हिंदुजा हॉस्पिटल,मुंबई येथील प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉक्टर बी.के मिश्रा, मुंबई येथील बॉम्बे हॉस्पिटलचे डॉक्टर अनिल कारापूरकर, मुंबई येथील बॉम्बे हॉस्पिटलचे चंद्रशेखर देवपूजारी,के.ई. एम हॉस्पिटलचे डॉक्टर बटुक डिवोयरा,सायन हॉस्पिटल,मुंबई येथील डॉक्टर नितीन डांगे,के.ई. एम हॉस्पिटलचे डॉक्टर त्रिमूर्ती नाडकर्णी, लीलावती हॉस्पिटल,मुंबई येथील डॉक्टर अतुल गोयल,के.ई. एम हॉस्पिटल,हैदराबाद डॉक्टर मानस पनिग्रही,बेंगलोर येथील सुप्रसिद्ध डॉक्टर जी. रघुराम, तिरुवंतपुरमचे डॉक्टर सुरेश नायर, सोलापूर येथील डॉक्टर काटीकर दत्तप्रसन्न,औरंगाबाद येथील डॉक्टर मिलिंद दुनाखे आदींची विशेष उपस्थिती असणार आहे.ही परिषद महाराष्ट्र विशेषतः मराठवाड्यातील न्यूरोसर्जन यांच्यासाठी फार मोठी आणि महत्वाची किंबहुना फार मोठी पर्वणी आहे अशी माहिती या परिषदेचे आयोजन सचिव तथा मराठवाड्यातील प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉक्टर हनुमंत किणीकर यांनी दिली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वगुणसंपन्न राजे

मुंबई, : छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वगुणसंपन्न राजे होते. त्यांच्या प्रेरणेतून आणि त्यांनी घालून दिलेल्या आदर्शानुसारच शासन काम करत असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

कुर्ला पश्चिम येथील संत गाडगे महाराज विद्यालय येथे उभारण्यात आलेल्या मुंबईतील पहिल्या छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार पूनम महाजन, आमदार ड. आशीष शेलार, आमदार पराग आळवणी, संत गाडगे महाराज संस्थेचे अध्यक्ष प्रकाश उर्फ भाऊ चौधरी उपस्थित होते.

मुंबईतील पहिल्या छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचे उद्घाटन करणे हा माझ्यासाठी भाग्याचा क्षण असून महाराजांसमोर नतमस्तक होण्याचे सौभाग्य लाभल्याचे सांगून उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रभू श्री रामाप्रमाणेच समाजातील सर्व घटकांना एकत्र करण्याचे काम केले. सर्व समाजातील लोकांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये लढण्याची प्रेरणा निर्माण



केली. गुलामगिरीच्या विरुद्ध लढा उभारला. माँ जिजाऊ साहेबांनी दिलेल्या शिकवणीतून त्यांनी स्वराज्याची निर्मिती केली. माता –भगिनींचे रक्षण केले. छत्रपती शिवाजी महाराजांची अर्थनीती, राजनीती, परराष्ट्रनिती याचा अभ्यास जगभरात केला जातो. त्यांनी पर्यावरण संरक्षणाचे काम कसे करावे हा पाठ शिकवला, असेही उपमुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, महिला सन्मान आणि महिला सुरक्षा या विषयी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी काम करत आहेत. २०४७ पर्यंत भारत विकसित देश बनवण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेतूनच सुरू आहे. देशाची पुढील हजार वर्षांची वाटचाल कशी असावी याचा वस्तुपाठच महाराजांनी दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वाभिमान, तेज यातूनच नव भारत निर्मितीचे काम करत असल्याचेही उपमुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांची आरती करण्यात आली.

# सन्मान लातूरकरांचा सोहळ्यात माझं लातूर परिवार समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

लातूर : छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त लातूरात आयोजित छत्रपती शिवाजी महाराज फेस्टिवल २०२४ सन्मान लातूरकरांचा या कला आणि सांस्कृतीक सोहळ्यात माझं लातूर परिवाराला समाजरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत आयोजकांनी माझं लातूर परिवाराची निवड केली.

बिडवे लॉन्स येथे दोन दिवस चाललेल्या या फेस्टिवलमध्ये चित्रकला, रांगोळी, लोकनृत्य, फॅन्सी ड्रेस, गडकिल्ले प्रदर्शन, शिवगर्जना, तलवारबाजी, दांडपट्टा अशा पारंपरिक स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेच्या शेवटी सन्मान लातूरकरांचा हा विशेष सोहळा घेण्यात आला. यात माझं लातूर परिवाराला गौरविण्यात आले. परिवाराच्या वतीने हा पुरस्कार शिरीषकुमार शेरखाने, डॉ सितम सोनवणे आणि उमेश कांबळे यांनी स्वीकारला. शाल, सन्मानचिन्ह, गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. याप्रसंगी माझं लातूर परिवाराचे सतीश तांदळे यांच्यासह परिवारातील अनेक मान्यवर सदस्य उपस्थित होते.




डी स्टार डान्स स्टुडिओ आणि साळुंके अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले होते. या फेस्टिवल मध्ये स्नेहा बरडे, प्रतिक्षा साळुंके, राजश्री बनसोडे, डॉ जयश्री हुजरे आदि मान्यवरांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती तर या पारंपारिक कला आणि सांस्कृतिक सोहळा विवेक साळुंके, प्रशांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाला.

## इयत्ता बारावी परीक्षेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या शुभेच्छा

लातूर (जिमाका) : इयत्ता बारावीची परीक्षा बुधवारपासून सुरु



झाली. यानिमित्ताने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दयानंद महाविद्यालय येथील परीक्षा केंद्रावर जावून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. तसेच त्यांना गुलाबपुष्प देवून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

बारावीची परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या आयुष्यतील महत्वाचा टप्पा आहे. या परीक्षेचे कोणतेही टेन्शन न घेता विद्यार्थ्यांनी संयमाने परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले. तसेच विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

दयानंद महाविद्यालयाच्या नियामक मंडळाचे सदस्य विशाल अग्रवाल, त्यांच्या पत्नी श्रीमती स्मिता अग्रवाल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड व त्यांच्या पत्नी श्रीमती जयमाला गायकवाड, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा केंद्र प्रमुख अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे यावेळी उपस्थित होते.

## ज्येष्ठ निवेदक अमिन सयानी यांच्या निधनाने रेडिओच्या इतिहासातील सुवर्णअध्याय संपला

मुंबई, :- रेडिओच्या आवाजाचा अनभिषिक्त सम्राट, ज्येष्ठ निवेदक अमिन सयानी यांच्या निधनाने भारतीय रेडिओच्या सांगीतिक इतिहासातील सोनेरी अध्याय संपला आहे. रेडिओ हेच माहिती व



मनोरंजनाचे एकमेव साधन होते त्या काळात अमिन सयानी यांनी १९५२ ते १९९४ अशी तब्बल बेचाळीस वर्षे रेडिओवर गीतमाला सादर केली. त्यांच्या शैलीदार, रसाळ निवेदनाने रेडिओवरील गीतांची गोडी कैकपटीने वाढवली. संगीत रसिकांच्या कितीतरी पिढ्यांचे कान त्यांच्या निवेदनानं तृप्त केले. त्यांनी रेडिओवर घेतलेल्या गायक, गीतकार संगीतकारांच्या मुलाखती हा भारताच्या सांगीतिक वाटचालीचा अमूल्य ठेवा आहे. त्यांच्यासारखा निवेदक भारतीय रेडिओवर असणं आणि त्याचा आवाज ऐकायला मिळणं, हा अवर्णनीय आनंद होता. त्यांचं निधन ही भारतीय कला, सांस्कृतिक क्षेत्राची कधीही भरुन न निघणारी हानी आहे. मी अमिन सयानी साहेबांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ज्येष्ठ निवेदक अमिन सयानी यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त करुन आपल्या शोकभावना व्यक्त केल्या.

### कर्नाटक सीमा भागातील मराठी भाषिक नागरिकांच्या पाठीशी राज्य शासन खंबीरपणे उभे

मुंबई, : महाराष्ट्र – कर्नाटक सीमा भागातील मराठी भाषिक नागरिकांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी शासन संवेदनशील आहे. यासंदर्भातील न्यायालयीन लढा देण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्न करीत आहे. राज्याने याबाबत समन्वयक मंत्र्यांची नेमणूक केली आहे. त्यांच्या माध्यमातून सीमावर्ती मराठी भाषिक नागरिकांच्या समस्या सोडविण्यात येत आहेत.



या प्रश्नी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे संवेदनशील असून त्यांच्या नेतृत्वाखाली शासन सीमावर्ती भागातील ८६५ गावांतील मराठी भाषिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असे उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.

महाराष्ट्र एकीकरण समितीच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे मंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत महाराष्ट्र एकीकरण समितीचे शिष्टमंडळ व संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत, सीमावर्ती भागातील मराठी भाषकांच्या मागण्यांबाबत सविस्तर चर्चा झाली. बैठकीस सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक, सहसचिव (विधी) प्रशांत सदाशिव, उपसचिव रा. दि. कदम – पाटील, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, एकीकरण समितीचे कार्याध्यक्ष तथा माजी आमदार मनोहर किणेकर, समितीचे दिनेश ओऊळकर, प्रकाश मरगाळे, ड एम. जी पाटील आदी उपस्थित होते. सीमावर्ती भागातील मराठी भाषिकांना राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ देण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील असल्याचे सांगत मंत्री श्री. देसाई म्हणाले, सीमावर्ती भागातील ८६५ गावांमधील मराठी भाषिकांना महात्मा फुले जनआरोग्य योजना, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी या योजनांचा लाभ मिळण्यासाठी तहसिलदार दर्जाचा अधिकारी नियुक्त करण्यात आला असून शिनोली (ता. चंदगड, जि. कोल्हापूर) येथे कार्यालय असणार आहे. कायदेशीर पातळीवर लढा देण्यासाठी समन्वयक मंत्र्यांचे शिष्टमंडळ दिल्ली येथे जावून नियुकत केलेल्या विधीज्ज्ञांशी चर्चा करणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याबाबत आग्रही असून सातत्याने त्यांच्या स्तरावरही पाठपुरवा करण्यात येत आहे. सीमावर्ती भागात नागरिकांचे प्रशासनातील काम जलद गतीने होण्यासाठी मराठी भाषा समजणाऱ्या दुभाषी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत कर्नाटक शासनाला पत्र देण्यात येईल.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## झरोका

एक – पक्षाचे नेते प्रवक्ते यांच्यासाठी पक्षप्रमुखांनी आदेश काढून स्पष्ट केले आहे की; यापुढे कोणास नैतिकता हा शब्द वापरायचा असेल तर पूर्वपरवानगी घ्यावी लागेल यातून काय बोध घेऊन शोध करावा हेच कळत नाही डोकं सन्नाटलय.

दुसरा – अरे, असं भरकटत जायला काय झालय. लोकशाही राजकारणात हे असेच घडत असते समजले .आज नैतिकता शब्दासाठी परवानगी घ्यावी म्हणतात उद्याला अनैतिक शब्द मनसोक्त वापस असा आदेश देतील कारण पक्ष चालवायचा असतो कारण नैतिकतेवर पक्ष चालत नाही हे लक्षात ठेव.

एक – अहो, नैतिकता, प्रामाणिकपणा, श्रद्धा आणि निष्ठा, न्यायिक, पारदर्शक कार्याला महत्त्वाचे असते मग नैतिकतेसाठी परवानगी म्हणजे काय हे सारे उलटेच वाटते.

दुसरा – अरे, पंजाब मध्ये आपली सत्ता आहे तो भाजपाला जड–अवजड झाला म्हणून चंदीगडच्या महापौरपदी भाजपच्या उमेदवाराची वर्णी लागावी म्हणून गैरवापर–अनैतिक मार्ग स्वीकारला पण सर्वोच्च न्यायालयाने भाजपला झटका देऊन आपचा उमेदवार विजयी ठरविला मग नैतिकता गेली खड्ड्यात म्हणूनच कोणीही भाषणात–निवेदनात किंवा खाजगी बोलण्या –लिहिण्यात नैतिकता हा शब्द वापरायचा असेल तर पक्षश्रेष्ठीची परवानगी घ्यावीच लागेल असा वटहुकूम काढला आणि देवदूत नरेंद्र मोदी यांच्या कार्यपद्धतीची जोपासना केली त्यात काय चूक आहे.

एक – अहो, कोणताही राजकीय पक्ष नैतिकता शब्दाला टाळू शकत नाही मग भाजपा पक्ष कोण लावून गेला काहीतरी स्पष्टीकरण देऊ नका समजलं.

दुसरा – अरे, मी कशाला नैतिक, अनैतिक तेच अडकून बसू मी तर कोणत्याच राजकीय पक्षाचा सदस्य नाही ना, चाहता नाही, तूच विचारलास म्हणून बोललो.

एक – अहो, नैतिकता शब्द वापरण्यासाठी परवानगीची गरजच नसते तो प्रत्येकाचा अधिकार आहे पण मीच तुमच्याकडे विचारणा केली आणि फसगत झाली नरेंद्र मोदी आणि तुमच्यात काहीच फरक दिसत नाही हे मात्र कळले. बरे झाले.

दुसरा – अरे, माझ्याने समाधान होत नसेल तर नितेश राणे, जरंगे पाटील हेच तुला नैतिकता वगैरे काय ते सांगितले बडबड करू नकोस.

## काय बोलता राव ?

महाराष्ट्रात २८ टक्के लोकसंख्या असलेला मराठा समाज व पिढ्यान पिढ्या इतका मागास कसा काय राहिला याचा सांगोपांग विचार करून एकनाथ शिंदे सरकारने शिक्षण व नोकरीत दहा टक्के आरक्षण एकदिवसीय अधिवेशनात चर्चेविनाच पारित करून मराठा समाजाला आरक्षण जाहीर केले परंतु एकही सत्ताधारी किंवा विरोधी लोकप्रतिनिधीने मराठा आरक्षण टिकेल की उडेल, फेटाळले जाईल याबद्दल ठामपणे सांगितले नसल्याने मराठा समाज वंचितच राहतो की काय अशी शंका येतेय.

**काय बोलता राव,**

अरे, प्रथमत; तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाणयांनी २०१४ साली मराठा आरक्षण लागू केले ते सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविले.

२०१८ साली देवेंद्र फडणवीस सरकारने मराठा आरक्षण जाहीर केले तेही त्रुटीमुळे सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवून फेटाळले.

२०२४ आज रोजी कालच्या अधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षण चर्चे विना लागू केले त्यावर जरंगे पाटील यांचे समाधान नसले तरी ते सर्वोच्च न्यायालयात टिकते की नाही गुलदस्त्यातच असले तरी लोकसभा निवडणुकीसाठी बाजी मारून नेली अशीच राजकीय वर्तुळात उलट सुलट कुजबूज होत असून मराठा समाजाचे भले होईल न होईल परंतु जरंगे पाटील हिरो बनला, मराठ्याचा नेता बनला आहे. उद्याला लोकप्रतिनिधी होणारच मग बोला दाजीबा.

# न्याययंत्रणा आणि लोकशाही बळकट होताना !

## संपादकीय...

आमजनता, त्यांची लोकशाही आणि त्यांच्या हातून पेरली गेलेली शासकीय यंत्रणा, गल्ली ते दिल्लीपर्यंतचे लोकप्रतिनिधी आणि त्यातूनच राज्य– राज्यातील सरकारासह केंद्रातील भारत सरकार हेही जनता– लोकप्रतिनिधीचेच एक सर्वसामान्य कार्यकत मंडळ –मंत्रीगण असते. पण याच मंत्रीगणानी आम्ही –मीच खरा राज्याचा –भारताचा कर्ता– करविता– मालक –चालक– पालक– सेवक म्हणून राजकीय डोबकावळ्याचा खेळ रचून शासकीय यंत्रणेला गुलाम– नपुसक करून मनाजोगा– जोगी– योगी कार्यक्रम आखून चक्क लोकशाही देशाला– भारताला नकळत सुरूगं लावून पोखरण्याचा जो बावरी खेळ आखला होता त्या विपरीत खेळास –मनमानी –निर्णय प्रक्रियेसच चक्क कोलदांडा घालून रुमणी आडा–घाठ बांधून भारताचे केंद्र सरकार अर्थात मोदी सरकारला न्यायालयाने जे खडेबोल सुनावून सरकारी पाय सत्तेच्या भूमीतच पण कोठे आहेत या संदर्भात खडेबोलातुन चिंतन करायला लावले त्यावरून राजकीय पलटवार मोदी राजा– बजायेगा बाजा अशीच कुतूहलात्मक चिंताजनक प्रतिक्रिया उमटताना दिसते आहे ती गंभीर वाटते.

शासकीय यंत्रणेचा वापर देश हितासाठी राज्य राज्याच्या विकासासाठी सर्वांगीण उन्नतीसह नागरी समस्या सोडविण्यासाठीच करायलाच पाहिजे असा संविधानात्मक दंडक असताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मोदीजी समर्थक राज्य– राज्याचे मुख्यमंत्री, निवडणूक आयुक्त, विधानसभा अध्यक्ष नार्वे कर यांनी त्यांच्या–त्यांच्या अधिकारातून जो थयथयाट केला त्यावर सर्वोच्च–न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाने सत्ताधारी आणि सरकारी यंत्रणाची जी कडक शब्दांत कान उघाडणी केली ती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांना एक चपराक ठरावी असा बोलबाला होत असला तरी नथनीमुळे नाक तुटले तरी श्वासोश्वास चालूच आहे राहणारच म्हणून सत्ताधारी वाहक डरकाळ्या फोडत असले तरी आज घडीला न्याय यंत्रणा व लोकशाही बळकट होताना दिसते आहे ते भारतीय विविध जाती–धर्मातील महिला–पुरुषांचे भाग्यच म्हणावे अशीच लोक भावना सदसद विवेक बुद्धीने प्रकट होताना दिसते आहे.

आज घडीला भारतीय लोकशाही–संविधान, न्यायंत्रणा, प्रशासकीय व्यवस्थेचे निवडणूक आयोगासह सत्ता कारणाचे मालक–पालक–चालक–शासक–प्रशासक वगैरे सर्व काही प्रधानमंत्री नरेंद्र मोदीच आहेत अशीच व्यवस्था लोकसेवक नरेंद्र मोदी यांनी करून ठेवल्याने बिल्किस बानो प्रकरण असेल किंवा शेतकरी आंदोलन असेल, न्यायाधीशाच्या नियुक्ती असतील किंवा राज्यपालाच्या नियुक्ती असोत, दिल्ली प्रशासक असेल किंवा महाराष्ट्रातील सत्तांतर असो किंवा चंदा कोचर प्रकरण अथवा निवडणूक रोखेआयोग असेल अशा अनेक विषयासंदर्भात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची एकतर्फी–स्वार्थी छाप असावी, आहे असेच राजकीय वर्तुळात बोलले जात असून, अशा या अलग कृती–वृत्तीवर कोणा पत्रकराने लिहिले–बोललेच तर त्यास डांबण्यापर्यंत केंद्र सरकारची, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची मजल –दरमजल कार्य प्रणाली दृष्ट घातकी ठरते आहे. म्हणूनच मुंबई उच्च न्यायालयासह सर्वोच्च न्यायालयाने जे काही खडे बोल सत्ताधारी लोकप्रतिनिधी आणि शासकीय यंत्रणा सुनावले आहेत त्याचा शोध आणि बोध प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी घेऊन स्वत: सह इतर सत्ताधारी आणि शासकीय यंत्रणा सीबीआय, ईडी, बेडी, बेदी वगैरेंना सावध करतील काय अशीच लोक भावना व्यक्त होताना दिसते आहे. ही बाब नाकारण्या इतपत सोपी नसावी असे वाटते.

गेल्या दहा वर्षातील केंद्रीय मोदी सरकारचा किंवा भाजपप्रणित राज्य, राज्याचा कारभार हा हुकूमशाही एक अधिकार शाही आणि मनमानी पद्धतीनेच चालतो आहे. भारताचे भाग्यविधाते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, प्रशासनाने तर चवच सोडून दिलेली दिसते आहे कारण आधी गुन्हा दाखल करायचे, धमकवायचे आणि जमलेच नाही तर अटक करून त्यांची बदनामी करायची ही केंद्रीय तपास यंत्रणाची रीतच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी परवाला काळिंबा फासणारी ठरते पण काळे–पांढरे, ओलसर–वाळलेले सारेच जाळण्याची–जोपासण्याची शक्ती मोदीमय भाजपात असल्यानेच सत्ताधारी आणि शासकीय प्रशासकीय यंत्रणावर न्यायालयाने कोरडे ओढून जो संताप व्यक्त केला आहे, त्यातून हे सत्ताधारी भाकडी–माकडं कोलंट उड्या मारून सत्ताधिकार बनवून जनतेची फसवणूक करीत असतील तर उद्याला नितेश राणे मनोज जरंगे पाटील यांच्यासारखे लोकप्रतिनिधी बनले तर महाराष्ट्रासह लोकशाही भारताचे काय मातरं होईल याचा भरोसा नसून न्याययंत्रणा, लोकशाही बळकट होताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सह त्यांचा फौज फाटा पुन्हा राष्ट्रीय–राज्यस्तरावर सत्ताधारी म्हणून मानगुटीवर बसू नये हेच संदेशात्मक स्पष्टीकरण न्यायालयाने केले असावे या संदर्भात एवढेच.

# राजकारणाची बदललेली परिभाषा

**बालपणापासून काँग्रेस संस्कृतीत वाढलेले आणि गेली ४० ते ५० वर्षे पक्षात कार्यरत असलेले काँग्रेस पक्षाचे दिग्गज नेते तसेच महाराष्ट्र राज्याचे दोनदा मुख्यमंत्री पद भूषविलेले अशोक चव्हाण ह्यांनी काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यात्त्वाचा तसेच आमदारकीचा राजीनामा देत अखेर भाजपात प्रवेश केला.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने सर्वांनाच राजकिय स्वातंत्र्य बहाल केले असल्यामुळे कोण कोणत्या पक्षात जातो किंवा का जातोय हे विचारण्याचा कुणाला अधिकार नाही. तो त्याचा वैयक्तिक निर्णय असतो.परंतु ते ज्या काँग्रेस संस्कृतीच्या वातावरणात वाढले,परिपक्व झाले,त्याला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय त्यांनी का घेतला ? तसेच त्यांनी ज्या पक्षात प्रवेश केला, त्याचे नेमके कारण काय ? किमान ह्याचा खुलासा करणे त्यांचे कर्तव्य होते.ज्या काँग्रेस पक्षात त्यांचे वडील शंकरराव चव्हाण स्वातंत्र्य चळवळीपासून कार्यरत होते.महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री होते.अशोकराव त्यांचे सुपुत्र नसते तर त्यांना इतक्या तरुण वयात आणि संघटनेत भरीव काम न करता मंत्रिपद किंवा मुख्यमंत्री पद मिळाले असते का? म्हणुन ज्या पक्षाने त्यांना,कामगिरीच्या जोरावर नाही तर शंकररावांचे पुत्र म्हणुन सत्तेची उच्च आणि अत्युच्च खुर्चीत बसविले,त्या पक्षाचा त्याग करण्याची सबळ कारणे जाहीर केली असती तर जनतेला पडलेल्या प्रश्नांना परस्पर उत्तर मिळाले असते. परंतु भाजपा प्रवेशानंतरच्या पत्रकार परिषदेत ते एकही ठोस कारण सांगू शकले नाही.त्यामुळे जनतेच्या मनातील शंका अधिक दृढ झाली. संरक्षण विभागाच्या जमिनीवर उभारलेल्या आदर्श सोसायटीच्या घोटाळ्यामुळे त्यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला.सध्या ते प्रकरण न्यायालयात प्रलंबित असून भाजपाने नुकत्याच काढलेल्या श्वेतपत्रिकेत त्याचा आवर्जून उल्लेख केला आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जाहीर सभेत त्याबद्दल टीका केली होती. या पार्श्वभूमीवर त्यांच्या भाजपा प्रवेशाच्या दुसर्याच दिवशी त्यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर केली.त्यामुळे त्यांची भाजपा प्रवेशाचे कारण स्पष्ट झाले.गेल्या काही वर्षांमध्ये विरोधी पक्षांतील राजकारण्यांवर मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळ्या संदर्भात सरकारी यंत्रणांच्या धाडी पडत आहेत. त्यापैकी काही लोकांना तुरुंगवासाचा अनुभव घ्यावा लागला तर काही चौकशीच्या फेऱ्यात अडकून बेजार झाले आहेत.ह्यातील वैशिष्ट्य म्हणजे सत्तेत असणारे किंवा त्यांना पाठींबा देणारे ह्यांच्यापैकी कुणावर अशा प्रकारची चौकशी किंवा भ्रष्टाचाराचे आरोप नाहीत. ज्या लोकांनी सत्तेचा गैरवापर करून घोटाळे केले आहेत,त्यांची पूर्णपणे चौकशी होऊन,त्यांच्यावरील आरोप सिद्ध झाला तर त्यांना शिक्षा झालीच पाहिजे. ह्यात दुमत असण्याचे कारण नाही.परंतु अशा लोकांनी सत्ताधारी पक्षाचा झेंडा खांद्यावर घेताच, त्यांच्या मागे लागलेले चौकशीचे शुक्लकाष्ठ स्थगित झाल्याचे पाहून सर्वसामान्य माणूस बुचकळ्यात पडला आहे.

भारत हा जगातील सर्वांत मोठा लोकशाही प्रणाली असलेला देश आहे.तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानातील कायद्यानुसार चालतो.संविधानाने धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व अंगीकारले असून त्याने स्वातंत्र्य,समता,बंधुत्त्वासह प्रत्येकाला धर्म स्वातंत्र्य,विचार स्वातंत्र्य तसेच राजकिय हक्क प्रदान केले आहेत.त्यानुसार प्रत्येक जण त्याला योग्य वाटणार्या धर्माचे,राजकिय पक्षाचे,किंवा संघटनेचे समर्थन करतो. ह्या संवैधानिक लोकशाहीने सत्ताधारी पक्षाबरोबर विरोधी पक्षाला देखील महत्वाची भूमिका बजावण्याचे तसेच चुकीच्या गोष्टींना विरोध करीत व्यक्त करीत त्याची जाहीर वाच्यता करण्याचे अधिकार दिले आहेत. ह्याचाच आधार घेत देशाने स्वातंत्र्यानंतरच्या काही वर्षात विरोधी पक्ष नेत्यांची जनहिताची आंदोलने,खरमरीत केलेली भाषणे, जनतेचे प्रश्न,विकास योजना ह्यावर अभ्यासपुर्ण केलेली निवेदने ह्या देशाने अनुभवली आहेत.त्यामुळे देशाच्या,राज्याच्या भरभराटीला,प्रगतीला,जनहिताच्या योजना पूर्णत्वास नेण्यास मदत झाली आहे.

परंतु हल्ली राजकारणाची परिभाषा बदलून गेली आहे.निव्वळ स्वहित,सत्ता,आणि त्यातून मिळणारे फायदे यासाठी राजकारणात येणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे जनहित,ध्येय,नीतिमत्ता,विचार ह्यांना गुंडाळून ठेवीत,कुणीही कोणत्याही पक्षात प्रवेश करतांना दिसतो.त्यामुळे कोण,कुठल्या पक्षात आहे? हे कळेनासे झाले आहे.राजकारणातील तत्त्व,विचारप्रणाली,समाजाप्रती असलेली त्यागयुक्त कर्तव्य भावना पूर्णता लोप पावली असून त्याची जागा स्वार्थ,कोडगेपणा,दबंगगिरी,झुंडशाही, जातींच्या राजकारणाने धुमाकूळ घातला आहे.कसे ही करून सत्तेत येणे.हे राजकारणात येण्याचे उद्दिष्ट झाले आहे.मग ती सत्ता ग्रामपंचायत,नगरपालिका,विधानसभा ते थेट लोकसभेवर निवडून येण्याची असो वा एखाद्या सरकारी महामंडळावर लावून घेण्याची असो.सध्या घराणेशाहीने राजकारणात पक्का जम बनविल्याचे चित्र आहे. त्याविषयी अधिक न बोललेले बरे.देशाने संविधानाचा स्विकार करून जवळजवळ ७० वर्षे होत आली आहेत. परंतु सत्तेच्या हव्यासापोटी गेल्या ३०/४० वर्षापासुन दलबदलू राजकारणाला उत आल्याचे दिसते. त्यामुळे राजकारणात आयाराम,गयाराम शब्द रूढ झाला आहे. त्यामुळे व्यक्ति स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य आणि राजकिय विचारधारा ह्यांची मुस्कटदाबी होत असल्याचे विदारक चित्र देशाच्या राजकीय क्षितिजावर दिसत आहे.

भारतात भिन्न विचारसरणी किंवा राजकिय भूमिकांमध्ये वैचारिक वाद ही नवीन गोष्ट नाही.परंतु त्याला तारतम्य तर होतेच त्याचबरोबर वैचारिक उंचीची पातळी होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी ह्यांच्या विचारांत टोकाची मतभिन्नता होती. परंतु त्यांनी कधीच समाजहित सोडून व वैयक्तिक फायद्यासाठी एकमेकांवर पातळी सोडून टीका केली नाही. टिळक आगरकर वाद,नेहरू,पटेल,राजेंद्र प्रसाद ह्यांच्यातील विचार भिन्नता,महात्मा गांधी आणि सुभाषचंद्र बोस ह्यांचे मतभेद सर्वश्रुत आहेत. त्यांचे मतभेद विचारधारेत आणि लक्ष्य स्वतंत्र भारत असल्यामुळे त्याची जाहीर वाच्यता झाली नाही. लोकसभा निवडणुक १९८४ ला अटलबिहारी वाजपेयी पराभूत झाले. तेव्हा राजीव गांधींनी तुमच्या सारखा नेता विरोधी पक्षात असणे आवश्यक आहेअसे सांगून त्यांना राज्यसभेवर निवडून आणले.महाराष्ट्राला देखील विरोधी पक्ष नेत्यांची मोठी परंपरा आहे.एस.एम.जोशी,उद्धवराव पाटील,आर.डि. भंडारे,कृष्णराव धुळप,उत्तमराव पाटील,मृणाल गोरे ह्यांच्यावर कधीच कोणत्याही प्रकारचे आरोप झाले नाही. तसेच त्यांच्या समकालीन सत्ताधाऱ्यांवर देखील असे आरोप झाले नाही.बाळासाहेब ठाकरे,शरद पवार,डि.बि.पाटील,सुशीलकुमार शिंदे, विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंढे,मनोहर जोशी ह्या सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांनी एका व्यासपीठावर आल्यानंतर,त्यांच्या भाषणातून एकमेकांवर मारलेल्या कोपरखळ्या,प्रसंगोचित घटनांचा उहापोह ह्यांनी वैचारिक उंची अधोरेखित झाल्याचे महाराष्ट्राने अनेकदा अनुभवले आहे.

मग ही राजकिय,सामाजिक परिस्थिती अशीच कायम राहणार का? असा प्रश्न सहाजिकच मनात येतो.परंतु जगात कायम परिवर्तन होत असते. ही गोष्ट विसरून चालणार नाही.ह्या देशात पूर्वापार जाती व्यवस्थेची प्रथा चालत आली होती. तेव्हा ह्या व्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांना स्वप्नातही वाटले नसेल की,या देशात छत्रपती शाहू महाराज नोकऱ्यांमध्ये आरक्षण सुरू करतील.महात्मा ज्योतीराव फुले स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवतील.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने प्रज्ञासूर्य जन्माला येऊन ही सगळी व्यवस्थाच उध्वस्त करून,या देशातील प्रत्येक नागरिकाला संविधानाने समान हक्क देऊन सगळ्यांना एका रांगेत उभे करील.त्यामुळे आपण आशावादी असणे आवश्यक आहे.ह्या परिस्थितीत देखील बदल होईल. त्यासाठी सर्वसाधारण लोकांचा उघड्या डोळ्यांनी राजकारणात मोठ्या प्रमाणात सहभाग आवश्यक आहे. ह्या देशात मध्यम वर्गाने नेतृत्व करून कैक आंदोलने यशस्वी केली आहेत. सध्या हा वर्ग अलिप्त असल्याचे दिसते. त्या वर्गाने पुन्हा एकदा राजकारणात मुसंडी मारून पुढे यायला पाहिजे. गुंडगिरी प्रवृत्तींच्या लोकांना डोक्यावर घेऊन प्रदर्शन करणे थांबवले पाहिजे. भविष्यात जेव्हा जेव्हा निवडणुकीत मतदान करण्याची वेळ येईल, त्या त्या वेळेस कोणत्याही आमिषाला बळी न पडता, त्या संधीचे सोनं करीत योग्य उमेदवाराला मतदान करून निवडून आणणे हे आपले आध्य कर्तव्य समजले पाहिजे.असे जर आपण करू शकलो तर ती पुन्हा जनहिताच्या राजकारणाची सुरुवात असेल. हे निश्चित.

**जयभीम.**

**अरूण निकम. ९३२३२४९४८७.मुंबई.**

## सातपुडा वैंदर्भीय आंबेडकरी साहित्य संमेलनाचे वरवट बकाल येथे आयोजन

वरवट बकाल : (प्रतिनिधी) बुलढाणा



जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यात वरवट बकाल येथे अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य व संस्कृती संवर्धन महामंडळाचे तिसरे वैदर्भीय आंबेडकरी साहित्य संमेलन आयोजित करण्यात येणार आहे. स्थानिक सातपुडा प्रतिष्ठान ही सामाजिक संस्था या संमेलनाचे आयोजन करणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष भाऊ भोजणे यांनी दिली. सदर संमेलन हे १६ आणि १७ मार्चला आयोजित करण्यात आले आहे.

या संदर्भात सातपुडा प्रतिष्ठानच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक नुकतीच वरवट बकाल येथे संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी महामंडळाच्या अध्यक्ष डॉ.सीमा मेश्राम होत्या. यावेळी त्यांनी सुदृढ सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणासाठी साहित्य संमेलनाची आवश्यकता प्रतिपादन केली. महामंडळाचे निमंत्रक प्रशांत वंजारे यांनी सुद्धा आयोजनासंबधी मार्गदर्शन केले. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले असून कार्यकर्ते कामाला लागले आहे. यावेळी वामनराव ढगे,अमोल भिलंगे,ड विश्वजीत वानखडे, सदानंद इंगळे,अभयसिंह मारोडे,शाहीर नागोराव इंगळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचं वावडं का ?

आज वर्तमानपत्रामध्ये जातीयवाद्यांनी जेसिबिने बौद्धांची घरे केली उध्वस्त.या मुख्य मथळ्याखाली बातमी छापुन आली आहे.परळी तालुक्यातील कावेरी लॉजच्या बाजूला,हनुमान मंदिराशेजारील मैदानात गेल्या दोन पिढ्या वास्तव्यास असलेली घरे जातीयवादी महेश मुंडे आणि त्याच्या सात आठ साथीदारांसह येऊन जेसीबीने पाडल्याची तक्रार सत्यभामा पंडित पवळे ह्यांनी परळी पोलिस ठाण्यात दाखल केली आहे. त्याच बरोबर भगवान बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमांची विटंबना केल्याचे देखील तक्रारीत नमूद केले आहे.त्याचा मी निषेध करतो.

काल पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपरी वाघेरे विभागात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर बाह्य रुग्णालय हे रुग्णालयाचे नाव हटवून,केंद्र सरकारच्या योजनेचा आयुष्यमान आरोग्य मंदिर असा फलक लावण्यात आल्याची बातमी छापुन आली आहे. त्याविरुद्ध राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाकडे तक्रार दाखल केल्यानंतर, आयोगाने महापालिका आयुक्तांना नोटीस बजावून चौकशीचे आदेश देऊन संबंधितांवर कारवाईचे आदेश दिले आहेत.यथावकाश त्याची चौकशी होऊन,संबंधित दोषींवर कायदेशीर कारवाई होईल.ज्या औरंगाबाद मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला बाबांचे नाव देण्या देण्यासाठी १६ वर्षे आंबेडकरी जनतेने संघर्ष केला,त्या विद्यापीठात डॉ.वाल्मिक सरवदे ह्या बौद्ध व्यक्तींची प्रकुलगुरूपदी नियुक्ती होऊन ४८ तास होण्यापूर्वी,जातीयवादी शक्तींच्या दबावामुळे त्यांचा पदभार काढून घेतल्याचा अजब प्रकार घडला.त्यावर आंबेडकरी संघटनांनी आवाज उठवल्यामुळे त्यांची पुनर्नियुक्ती केली गेली.

जालना तालुक्यातील पारेगाव येथे बौद्ध वस्तीवर हल्ला करण्यात येऊन अनेक महिला, पुरुष जखमी झाले.नंतर जिल्हा समाज कल्याण अधिकार्यांनी लक्ष घालून कारवाई केली. सांगली जिल्ह्यातील वडूज येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाची कमान तोडण्याची घटना ताजी असताना,अकोला जिल्हा,पामुर तालुक्या अंतर्गत पांढुर्णा गावातील ग्रामपंचायतीने मंजूर केलेली बाबांच्या नावाची कमान तोडल्याच्या निषेधार्थ अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर सिद्धार्थ सोनोने व समाधान सोनोने ह्यांनी विष पिऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून दोघांची ही प्रकृती चिंताजनक असल्याचे कळते. एका ठिकाणी तर बाबांच्या गाण्याची रिंग टोन वाजवल्यामुळे मारहाण केल्याची घटना घडली आहे. अशा कितीतरी घटनांचा उल्लेख करता येईल. या सर्वांमध्ये एक समान धागा आहे.तो म्हणजे ह्या सर्व घटना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव आणि त्यांच्या बौद्ध अनुयायां संदर्भित आहेत.परिस्थितीच अशी आहे की,जातीय द्वेषातून अशा घटनांची वारंवार पुनरावृत्ती होत असल्यामुळे,त्यांचा पुन्हा पुन्हा उल्लेख करणे अनिवार्य आहे.मग प्रश्न असा निर्माण होतो की,ह्या लोकांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचे आणि बौद्धांच्या बाबतीत इतकं पराकोटीचं वावडं का आहे? रुग्णालयाचे नाव बदलून वाद निर्माण करण्याचा हेतू काय? कमानीला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिल्यामुळे असे कोणते मोठे संकट कोसळणार होते?

बौद्ध प्र कुलगुरूंची नियुक्ती करून ती दोन दिवसांत रद्द का केली जाते? हे आणि असे कितीतरी प्रश्न मनात उभे राहतात.ह्या घटनांना जबाबदार ह्या संबंधित व्यक्ति नसून,ह्या देशातील वर्षानुवर्षे चालत आलेली वर्णवादी व्यवस्थेमुळे रक्तात भिनलेली सामाजिक मानसिकता आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून पाऊणशे वर्षे होऊन गेली आहेत. जातीभेद पाळणे कायद्याने गुन्हा असला तरी,सनातनी मेंदूमधून त्याचे उच्चाटन झाले नाही. त्याचेच हे द्योतक आहे.ज्यांनी ह्या अभेद्य जाती व्यवस्थेला हादरे देत, माणसाला माणूसपण मिळावे म्हणुन प्रखर आंदोलन उभे केले.स्त्रियांना चूल आणि मूल ह्यातून मुक्त करून,त्यांना संवैधानिक अधिकार मिळवून दिले. शिक्षणाने माणसाची वैचारिक उंची वाढून त्याचा विकास होतो म्हणुन सर्वांना शिक्षण सक्तीचे व मागासवर्गीयांना मोफत केले. त्यांना नोकरी आणि शिक्षणात आरक्षण देऊन त्यांच्या विकासाचा, उन्नतीचा मार्ग मोकळा करून दिला. ह्या कृतीतून त्यांनी सामाजिक समरसता आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या दलित असण्यामुळे, त्यांची प्रचंड विद्वत्ता, सखोल अभ्यास, प्रखर देशभक्ती याकडे डोळेझाक करून कायम दुर्लक्ष केले. त्यांच्याविषयी गैरसमज पसरवून देशद्रोही असल्याचा कांगावा केला. त्यांनी आमच्याकडे माणूस म्हणुन बघा आणि तसे आचरण करा अशी मानवतावादी भूमिका घेत महाडच्या चवदार तळ्याचे पाणी पेटवले तर नाशिकच्या काळ्या रामाला साकडे घातले. परंतु त्याचा कुणावरही परिणाम झाला नाही. शेवटी त्यांनी हिंदु धर्माचाच त्याग करून बौद्ध धम्म अंगीकारला.अशा व्यक्तीबद्दल सनातनी प्रवृत्तींना आदर कसा असू शकतो? त्यांच्या रूढीप्रिय व्यवस्थेवर घाव घातल्याने त्या जखमा अध्याप भळभळत आहेत. त्या मानसिकतेतूनच ह्या घटनांचा उगम होतो.

आपण जर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जातीअंताच्या लढ्या पासून विचार केला तर असा निष्कर्ष निघतो की,सध्या घडणार्या घटनांच्या विरुद्धचा संघर्ष फक्त बौद्धांना म्हणजेच आंबेडकरी जनतेला करावा लागणार आहे.इतर आरक्षित वर्ग प्रत्यक्ष संघर्षांसाठी मैदानात उतरण्याची शक्यता कमी आहे.प्रत्येकाने स्वताचे जातीधारीत सवते सुभे उभे केले आहेत.म्हणुन ते फार फार तर ते पत्रकं काढून पाठींबा जाहीर करतील.हे आपण पक्के लक्षात ठेवले पाहिजे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने व्यक्ति स्वातंत्र्य,धर्म स्वातंत्र्य बहाल केले असले तरी,गेल्या काही वर्षांत या देशातील धार्मिक वातावरण कुरघोडीचे झाले असून, अतिशय चिंताजनक आहे.म्हणुन मी भारतीय बौद्ध महासभा ह्या मातृसंस्थेसह इतर धम्म संघटना,रिपब्लिकन पक्षाचे सर्व गट,संस्था,संघटना ह्यांना नम्रपणे आवाहन करतो की,त्यांनी ह्या परिस्थितीला कसे सामोरे जायचे ह्याबद्दल गांभीर्याने विचार करून निश्चित धोरण आखणे अगत्याचे आहे.कटू आहे पण सत्य आहे.

**जयभीम.**

**अरुण निकम.**

**९३२३२४९४८७.मुंबई.**

**मराठा .**
शांत मार्गाने सुटतो
कठीण प्रश्न सुध्दा
पटायला लागेपुन्हा
लाखमोलाचा मुद्दा
आडव्या वाटा नको
रस्ता सरळचं साधा
एकजूट हवी अभेद्य
अवघड व्यूव्ह भेदा
मीठ सत्याग्रह बापूं
आठवे पुन्हा एकदा
जिंकतो छत्रपतींचा
मराठा मावळा मर्दा
लढाई पुन्हा एकदा
पाळून नीट कायदा
एकजूट हो अखंड
एवढा करू वायदा
फितवू पाहीस्वार्थी
राजकारणाचा धंदा
माहीत नाही कुणां
मराठा वेगळा खंदा
मिळाले ते आरक्षण
मनस्थिती ना द्विधा
अंधातरी खूप इमले
आता पक्का रे वादा

**२**
**शंका ..**
जिथे तिथे घे शंका
प्रतिपक्षांची रे रीत
शंख करी शंकेखोर
संभ्रमात राही नीत
हे असेचं कसे असे
प्रश्न सर्वत्र उपस्थित
वाटत राहे सदोदित
काहीनसे व्यवस्थीत
प्रत्येक वेळी निषेध
कपाळी काळीफीत
फट् म्हणे ब्रह्महत्या
मन सदा दिवा भीत
विस्पारतात डोळे ते
दिसता कुठे नवनीत
लपत नाहीत अपेक्षा
उघड होते मनस्थित
नकारात्मक विचार
परिणाम हो विपरीत
वाकड्यावाटे चालता
घडते सगळे आक्रित
कसा होणार विकास
प्रगति होते अवस्थित
खिळ चालत्यागाडीस
उदिष्टे बने अनवस्थीत

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# विभागीय नमो महारोजगार मेळावा व करिअर मार्गदर्शन शिबिरात रोजगाराच्या संधींसह करिअरविषयी मिळणार मार्गदर्शन

**लातूर (जिमाका): राज्य शासनामार्फत लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या विभागस्तरीय नमो महारोजगार मेळावा आणि करिअर मार्गदर्शन शिबिरात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासोबतच रोजगार, स्वयंरोजगाराबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. यामध्ये २३ व २४ फेब्रुवारी २०२४ रोजी होणाऱ्या शिबिरात उद्योग, कृषीपूरक उद्योग, स्वयंरोजगार, माहिती व तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) याविषयांतील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. तसेच २४ फेब्रुवारी २०२४ रोजी भव्य नमो महारोजगार मेळावा होणार आहे. या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी युवक–युवतींनी https://nmrmlatur.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन राज्याचा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि लातूर जिल्हा प्रशासनाने केले आहे.**

लातूर येथील बार्शी रोडवरील शासकीय महिला तंत्रनिकेतन समोरील मैदानात विभागस्तरीय नमो महारोजगार मेळावा व करिअर मार्गदर्शन शिबीर होत आहे. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ग्रीकल्चरचे महासंचालक प्रशांत गिरबने, 'सह्याद्री फार्म' या शेतकरी उत्पादक कंपनीचे विलास शिंदे, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील रोहित पंढारकर, कर विषयक तज्ज्ञ राजीव रंजन, कुणाल क्षीरसागर, एडसील इंडिया लिमिटेडचे उत्तम गायकवाड, 'करिअर कट्टा' उपक्रमातील प्रमुख मार्गदर्शक दिनेश पवार, तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञ महिला, वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शन ऐकण्याची संधी युवक–युवतींना २३ व २४ फेब्रुवारी रोजीच्या करिअर मार्गदर्शन शिबिराच्या निमित्ताने मिळणार आहे. २३ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ पासून मार्गदर्शन शिबीर सुरु होईल.

२३ फेब्रुवारी रोजी यांचे लाभणार मार्गदर्शन

दिनेश पवार, मुख्य मार्गदर्शक, करिअर कट्टा: महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'करिअर कट्टा' या उपक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. दिनेश पवार हे करिअर विषयक नव्या संधींबाबत मार्गदर्शन करणार आहेत. 'चला करिअरचा मार्ग धरू', 'युवक विश्व बदलण्याची शक्ती' आदी विषयांवरील व्याख्याते, तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक अशी त्यांची ओळख आहे.

उत्तम गायकवाड, महाव्यवस्थापक, एडसील इंडिया लिमिटेड : केंद्र शासनाच्या शिक्षण मंत्रालय अंगीकृत कंपनी एजुकेशनल कंसल्टेंट्स इंडिया लिमिटेड अर्थात एडसिल कंपनीचे महाव्यवस्थापक असलेले उत्तम गायकवाड यांचे मार्गदर्शन या शिबिरामध्ये लाभणार आहे.

महिलांसाठी स्वतंत्र परिसंवादाचे आयोजन : करिअर मार्गदर्शन शिबिरामध्ये २४ फेब्रुवारी रोजी महिलांसाठी स्वतंत्र परिसंवाद आयोजित करण्यात अयेणार आहे. यामध्ये वैद्यकीय, शिक्षण, व्यवसाय, उद्योग, प्रशासन यासारख्या विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामिगिरी करीत असलेल्या महिलांचा सहभाग असाणार आहे. या क्षेत्रामध्ये उपलब्ध असलेल्या रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी याविषयी याद्वारे मार्गदर्शन केले जाणार आहे.

२४ फेब्रुवारी रोजीचे प्रमुख मार्गदर्शक

प्रशांत गिरबने, महासंचालक, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ग्रीकल्चर : प्रशांत गिरबने यांना एंटरप्रेनरशिप आणि गुंतवणूक क्षेत्रातील कामाचा अनुभव आहे. तसेच बँकिंग आणि वित्तीय सेवा, व्यवसाय विकास आदी क्षेत्रांमध्ये काम केले आहे. सध्या ते मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ग्रीकल्चरचे महासंचालक म्हणून कार्यरत आहेत.

विलास शिंदे, अध्यक्ष, सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनी : सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनी या शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक असलेले विलास शिंदे हे २३ फेब्रुवारी रोजी करिअर मार्गदर्शन मेळाव्यामध्ये युवक–युवतींना मार्गदर्शन करतील. सन २०१० मध्ये स्थापन झालेल्या या शेतकरी उत्पादक कंपनीसोबत १० हजार शेतकरी जोडले आहेत. भाजीपाला, फळे उत्पादन आणि निर्यात करण्यासोबतच त्यापासून विविध पदार्थांची निर्मिती या कंपनीमार्फत केली जात आहे.

रोहित पंढारकर, माहिती व तंत्रज्ञान तज्ज्ञ : माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात विविध नामांकित आस्थापनांमध्ये काम करण्याचा अनुभव असलेले रोहित पंढारकर यांना डाटा ॲनालिसिस, डिजिटल इमेज प्रोसेसिंग, अल्गोरिदम यामधील कामाचा अनुभव आहे. ते करिअर मार्गदर्शन शिबिरात डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय विषयी मार्गदर्शन करणार आहेत.

राजीव रंजन, कुणाल क्षीरसागर, (टॅक्स बडी) : कर नियोजन, आयटीआर फाइलिंग, टॅक्स नोटिस सोडवणे आणि जीएसटी फाइलिंग विषयी 'टॅक्स बडी'चे राजीव रंजन आणि कुणाल क्षीरसागर हे मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये प्राप्तिकर, जीएसटी, भांडवली नफा आदी बाबींविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे. रोजगार, स्वयंरोजगारासाठी अतिशय महत्वपूर्ण असलेल्या कर नियोजनविषयक या मार्गदर्शन सत्राचा सर्वांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

स्पर्धा परीक्षा विषयावर होणार मार्गदर्शन : स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून शासकीय सेवेत येण्यासा इच्छुक असलेल्या युवक–युवतींना योग्य मार्गदर्शन मिळावे, यासाठी करिअर मार्गदर्शन शिबिरात चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये प्रशिक्षणार्थी आयएएस, आयपीएस अधिकारी हे युवक–युवतींना मार्गदर्शन करणार आहेत.

# जनतेच्या प्रश्नासाठी शिवसेना भविष्यात निलंगा येथे सक्षम विरोधी पक्षाची भूमिका वठविणार – सोमनाथ स्वामी डिगोळकर

लातूर : निलंगा विधानसभा मतदार संघात गत अनेक वर्षापासून केवळ एकाच कुटूंबाची व दोन राजकीय पक्षाची एकाधिकारशाही, घरानेशाही राहिलेली असून मिळतेजुळते राजकारण करून एकूण सामान्य जनतेला झुलवत ठेवत जनतेच्या मुलभूत समस्या व महत्वाच्या विकासप्रश्नी बगल दिलेली असून अद्याप जनतेची मुलभूत प्रश्न सुटलेले नाहीत. आजही निलंगा, देवणी, शिरूर अनंतपाळ तालुक्यात गावागावाला जोडणारे रस्ते नाहीत. अपुर्या सिंचनाच्या सुविधा नाहीत अशा बाबीकडे तीन टर्म भाजपा आमदार राहिलेल्या नेत्यांनी जाणीवपुर्वक दुर्लक्ष केलेले दिसते. खरे पाहता जनतेसाठी विरोधी पक्षात सक्षम विरोधी पर्यायच उभे टाकु देऊ शकले नाहीत हीच खरी शोकांतीका असून याची उणीव निश्चितच पुढील काळात प्राधान्याने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांचा पक्ष भरून काढणारा असून नुतन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. दिनकरराव माने व जिल्हा समन्वयक मा. पप्पुभाई कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली निलंगा विधानसभा मतदार संघात



कडवी भगवी लाट निर्माण करून तमाम जनतेच्या प्रश्नासाठी सक्षम विरोधी पक्षाची भूमिका शिवसेना वठविणार असल्याचे मत निलंगा विधानसभा प्रमुख एक कडवे शिवसैनिक सोमनाथ स्वामी डिगोळकर यांनी निलंगा येथे जेष्ठ शिवसैनिक लिंबनमहाराज रेशमे यांच्या निवासस्थानी निलंगा विधानसभा मतदार संघातील विविध ज्वलंत प्रश्नावर चर्चा करतांना मांडले.

यावेळी जेष्ठ शिवसैनिक लिंबन महाराज रेशमे व डिगोळकर यांच्यात या भेटी दरम्यान निलंगा, देवणी, शिरूर अनंतपाळ तालुक्यातील अनेक महत्वाच्या विकासबाबीवर सखोल चर्चा झाली. सध्या ग्रामीण भागासाठी जनतेला दळण वळणासाठी महत्वाची भेडसावणारी समस्या ही गावे जोडणारे रास्ते व शेतीसाठी पाणंदरस्ते हे प्रामुख्याने आहेत. सदर रस्ते निर्माणसाठी माजी मुख्यमंत्री व शिवसेनेचे पक्षप्रमुख मा. उद्धवसाहेब ठाकरे यांनी मातोश्री महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना प्राधान्याने हाती घेऊन भरमसाठ निधीची तरतुद करून खेड्यातील अनेक रस्ते मजबुत व्हावे म्हणून एक कि.मी.साठी २५ लाखाचा भरघोस निधी राखीव ठेवला व सदर रस्ते मागील शासन काळात मोठ्या प्रमाणावर दर्जेदारपणे झाली परंतू सध्याच्या सत्तेतील आमदाराच्या दुर्लक्षामुळे निलंगा विधानसभा मतदार संघात चांगले रस्ते न होता विकास निधीच्या नावाखाली लुटमार कैलेली आहे तसेच शेतकर्यांसाठी सामान्य जनतेसाठी अनेक योजना राबवित असल्याची जाहिर करून या विद्यमान शासनाने प्रत्यक्षात सदर योजना या कागदावरच राबवत असल्याचे दिसते. त्याच बरोबर मतदार संघात सार्वजनिक बांधकाम विभागातील रस्ते तसेच दुरूस्तीचे काम ही निकृष्ठ दर्जाचे होत असून केवळ भाजपा कार्यकर्त्यांना पोसण्यासाठी, खुष करण्यासाठी हा विकासनिधीचा दुरूपयोग केला जात आहे. या व इतर ग्रामीण भागातील ज्वलंत प्रश्नावर शिवसेना आमागी काळात आवाज उठविणार असून तमाम शेतकरी व जनतेच्या प्रश्नासाठी कठोर भूमिका घेऊन सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी गोरगरीबाच्या कल्याणासाठी व आमदाराच्या निष्क्रिय कारभाराविरोधात शिवसेना आगामी काळात आवाज उठविणार असून तमाम शेतकरी व जनतेच्या हितासाठी कठोर भूमिका घेऊन आक्रमकपणे शिवसेना, शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांना सोबत घेऊन प्रशासन व राज्य सरकारला जाब विचारण्यासाठी भविष्यात भगवी लाट उभारणार असल्याचे शेवटी बोलतांना नमुद केले.

## तरुणांच्या 'जिव्हारी' लागणारा चित्रपट २६ फेब्रुवारी २०२४ रोजी अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर!



देशात राहणाऱ्या प्रत्येक उभरत्या तरुणाचं परदेशात जाऊन आपलं नशीब अजमावून पहाण्याचं स्वप्न असतं. परदेशात राहणाऱ्या अशाच एका तरुणाची कथा 'जिव्हारी' या चित्रपटात अलौकिक मांडली गेली आहे. २६ फेब्रुवारी २०२४ रोजी अल्ट्रा झकास या मराठी ओटीटीवर चित्रपटाचा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर होणार असून प्रेक्षकांना चित्रपटाचा अद्वितीय अनुभव घेता येणार आहे. परदेशात जाऊन नोकरी करणारा महाराष्ट्रातला एक तरुण पुन्हा आपल्या मायदेशी परततो. आपल्या गावी परत आल्यानंतर पुन्हा परदेशाची वाट न धरता इथेच आपल्या उपजीविकेचं साधन शोधण्याचा निर्णय घेतो. जवळजवळ चौदा नोकऱ्या बदलून आई वडिलांवर भार झालेला हा तरुण आयुष्यात पुढे अशी एक गोष्ट करतो, जे सर्वांनाच आश्चर्यचकित करणारं आहे. ती आश्चर्याची गोष्ट काय असेल हे प्रमुख कलावंत निकिता सुरेश कांबळे, सुयोग सुदर्शन भोरे, ओंकारसिंग उदयसिंग राजपूत, नील राजुरीकर, मनीषा दामोदर मोरे या नवोदित कलाकारांच्या टवटवीत अभिनयाने 'जिव्हारी'ची गोष्ट कळणार आहे. चित्रपटाची निर्मिती, लेखन आणि दिग्दर्शन गणेश शंकर चव्हाण यांनी केली आहे.

अनेक विषयांवर आधारित चित्रपट आम्ही प्रेक्षकांच्या भेटीस आणत असतो. यावेळी तरुणांना प्रेरित करेल असा आशयघन प्रेरक चित्रपट 'जिव्हारी' अल्ट्रा झकास ओटीटीच्या माध्यमातून आम्ही सादर करत आहोत. यापुढेही प्रेक्षकांचं तासंतास मनोरंजन होईल याकरिता आम्ही सातत्याने नवनवीन धाटणीचे चित्रपट आणण्याच्या प्रयत्नात आहोत. असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे सी.ई.ओ. श्री.सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले.

नवनवीन चित्रपट पाहण्यासाठी :- https://www.ultrajhakaas.com/marathi-movies

***प्रसिद्धी जनसंपर्क प्रमुख* : राम कोंडीलकर**
***संपर्क* : ९८२१४९८६५८**

## नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपीकांसह मालमत्ता नुकसानबाधितांना मदत वाटपासाठी १०६ कोटीवर निधीस मान्यता; निधी मंजुरीमुळे बाधितांना दिलासा – मंत्री अनिल पाटील

मुंबई, :- सन २०२० ते २०२२ या कालावधीत नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या व इतर मालमत्तेच्या नुकसानाकरिता बाधितांना मदत वाटपासाठी १०६ कोटी ६४ लाख ९४ हजार रूपये निधी वितरित करण्यास शासनाने मान्यता दिली असल्याचे मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील यांनी सांगितले. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असल्याने या निर्णयामुळे बाधितांना जलद मदत मिळेल, असा विश्वास मंत्री श्री. पाटील यांनी व्यक्त केला.

# फॅसिझमचे पुरस्कर्ते वाल्दमिर पुतीन

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादमिर पुतीन हे जगात आक्रमक राष्ट्राध्यक्ष म्हणून ओळखले जातात. रशियावर त्यांची एक हाती हुकूमत आहे. एक प्रकारे ते रशियाचे हुकूमशहाच आहे. रशियात त्यांच्याविरुद्ध कोणी ब्र शब्दही काढत नाही. सत्तेवर येताच त्यांनी घटना दुरुस्ती करून स्वतः कडे अमर्याद अधिकार घेतले इतकेच नाही तर त्यांनी निवडणुका न घेताच पुढील काही वर्षासाठी स्वतः ला रशियाचा अनाभिक्षित सम्राट म्हणून घोषित केले. लोकशाहीचा आणि त्यांचा दुरान्वये संबंध नाही. फॅसिझमचे कट्टर पुरस्कर्ते असलेले पुतीन यांना कोणी विरोध केलेला चालत नाही. त्यांच्या देशात त्यांना विरोध करणे म्हणजे साक्षात मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे आहे त्यामुळे तसे धाडस कोणी करत नाही मात्र काही लोक असतात जे मृत्यूलाही न घाबरता जनतेसमोर सत्य मांडण्याचा प्रयत्न करतात. असेच धाडस त्यांचे राजकीय विरोधक अलेक्सा नवालनी यांनी केले. नवालनी यांनी पुतीन यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले पुतीन यांनी त्यांच्या काळात मोठा भ्रष्टाचार केला असून या भ्रष्टाचाराविरुद्ध त्यांनी मोठे जनआंदोलन उभारले होते. जनतेचाही या आंदोलनाला मोठा पाठिंबा मिळत होता. या दरम्यान त्यांच्यावर एकदा विष प्रयोग ही करण्यात आला होता. ते जर्मनीत असताना त्यांच्यावर विष प्रयोग करण्यात आला. पुतीन यांनीच त्यांच्यावर विष प्रयोग करून त्यांना जिवेमारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तेंव्हा करण्यात आला होता. विष प्रयोग होऊनही नवालनी त्यातून बचावले होते. जर्मनीतून ते पुन्हा मॉस्कोत आले आणि त्यांनी पुतीन यांच्या विरोधातील आंदोलन पुन्हा सुरू केले. नवालनी यांना जनतेचा पाठिंबा मिळत आहे असे दिसताच पुतीन यांनी त्यांना पॅरोलचे उल्लंघन, फसवणूक आणि न्यायालयाचा अपमान या गुन्ह्याखाली अटक केली त्यांना तब्बल नऊ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली. पुतीन यांच्या या निर्णयाविरोधात रशियात मोठा जनक्षोभ होता मात्र उघडपणे तसे कोणीही बोलत नसे. दोन महिन्यांपूर्वी नवालनी यांना अचानक रशियाच्या तुरुंगातून अर्टिक सर्कलवर असलेल्या विशेष तुरुंगात हलवण्यात आले. नवालनी यांना ज्यावेळेस अर्टिक सर्कलच्या विशेष तुरुंगात हलवण्यात आले तेंव्हाच काही तरी विपरीत घडणार अशी शंका व्यक्त करण्यात आली आणि ती शंका मागील आठवड्यात अखेर खरी ठरली. मागील आठवड्यात नवालनी यांचा तुरुंगात मृत्यू झाल्याची बातमी आली. नवालनी यांचा आजापणामुळे मृत्यू झाल्याचे पुतीन सरकारकडून जाहीर करण्यात आले असले तरी अनेकांनी नवालनी यांचा मृत्यू आजारपणामुळे झाला नसून त्यांची हत्याच झाल्याचा आरोप केला आहे. खुद्द नवालनी यांच्या कुटुंबीयांनी देखील तसाच आरोप केला आहे. अर्थात नवालनी यांची हत्या झाली की त्यांचा नैसर्गिक मृत्यू झाला हे कायम गुलदस्त्यात राहणार आहे कारण हुकूमशहांच्या देशातील कोणतीही खरी गोष्ट जगासमोर येत नाही मग तो देश चीन असो उत्तर कोरिया असो की रशिया. अर्थात या तिन्ही देशांचे प्रमुख फॅसिझमचे प्रतिनिधित्व करतात म्हणूनच या देशात लोकशाही नसून हुकूमशाही आहे. चीन आणि उत्तर कोरिया या देशांतील प्रमुखां प्रमाणे पुतीन यांनीही रशियावर आपली एक हाती हुकूमत राखली आहे. एका सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेले पुतीन हे के जी बी या रशियाच्या गुप्तहेर संस्थेत काम करीत होते. तेथील त्यांच्या कामावर रशियाचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बोरिस येल्तसिन इतके खुश झाले की त्यांनी पुतीन यांना आपला राजकीय वारस बनवले. रशियात पुतीन यांच्याबाबतीत अनेक भाकडकथा प्रसिद्ध आहेत . के जी बी मध्ये असताना त्यांनी केलेले काम पाहून लोकांनी त्यांना हिरोची उपमा दिली होती मात्र आता ते ज्या पद्धतीने सरकार चालवत आहे त्याविषयी लोकांमध्ये त्यांच्याविरुद्ध प्रचंड नाराजी आहे. त्यांनी युक्रेनवर केलेला हल्ला अनेक रशियन नागरिकांना आवडला नाही. त्यातच नवालनी यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याने ही नाराजी आणखी वाढली आहे मात्र पुतीन यांना त्याचा काही फरक पडणार नाही कारण ते कधीच लोकशाही मानत नाही. मात्र आज नाही तर भविष्यात जनता रस्त्यांवर नक्की उतरेल आणि जनताच पुतीनशाहीचा अंत करेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात बारावी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी मार्च २०२४ सुरळीत सुरू

**प्राचार्य, उपप्राचार्य, केंद्र संचालक, उपकेंद्र संचालक यांनी पालक आणि परीक्षार्थी यांना पुष्पहार आणि पुष्पगुच्छ देऊन केले स्वागत**

लातूर : महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथे बारावी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२४ सुरळीतपणे सुरू झालेली आहे.

आज या परीक्षेचा पहिला दिवस असल्याने महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर आलेले पालक आणि परीक्षार्थी यांचे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, केंद्र संचालक उपप्राचार्य प्रा. संजय पवार, सहकेंद्र संचालक पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी पुष्पहार आणि गूलाब पुष्प देऊन स्वागत केले.

लातूर विभागीय मंडळाचे सचिव तथा अध्यक्ष सुधाकर तेलंग यांच्या मार्गदर्शनाखाली आज या परीक्षेचा प्रारंभ झाला आहे. या परीक्षा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांच्या देखरेखेखाली संपन्न होत असून केंद्र संचालक म्हणून उपप्राचार्य प्रा. संजय पवार आणि उपकेंद्र संचालक म्हणून पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे हे परीक्षेचे काम बघत आहेत. या परीक्षेसाठी प्रा. खपाटे एस. के. व प्रा. लवटे पि. डी. हे रनर म्हणून कार्य करीत आहे. त्यांचा श्री



महात्मा महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकरप्पा बिडवे, संचालक ॲड. श्रीकांतप्पा उटगे आणि अशोकप्पा उपासे यांच्या हस्ते सत्कार केला. कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्होकेशनल व्ही. सी. या शाखेचे एकूण ५८६ विद्यार्थी केंद्र क्रमांक ५२१ येथे परीक्षा देत आहे. या संपूर्ण परीक्षेचे नियोजन महाविद्यालयाच्या विज्ञान इमारतीमध्ये करण्यात आले आहे. या परीक्षा सकाळच्या सत्रात स. ११ ते दु. २.१० वा. व दुपारच्या सत्रामध्ये ३ ते ६.१० वा. वेळेमध्ये संपन्न होत आहे. या परीक्षेच्या त्या परीक्षा सुरळीत होण्यासाठी कला शाखेचे समन्वयक प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. रवींद्र सोनोने, वाणिज्य शाखेचे समन्वयक डॉ. टि. घनश्याम, प्रा. कल्पना गिराम, विज्ञान शाखेचे समन्वयक प्रा. वनिता पाटील आणि प्रा. नितीन वाणी आणि एच एस सी व्ही सी शाखेचे समन्वयक प्रा. व्यंकट दुडिले हे सहकार्य करीत असून या परीक्षेसाठी शिक्षकेतर कर्मचारी म्हणून कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, महादेव कोरे, गोपाळ तिरूमले, अनिल कोळळे, नरेश वाडकर, शुभम बिराजदार, जगन्नाथ येचेवाड, संतोष येचेवाड, जलील सय्यद आदींचे सहकार्य मिळत आहे. या परीक्षा दि. २१ फेब्रुवारी ते १९ मार्च २०२४ या कालावधीमध्ये संपन्न होत आहे.

## व्हॉईस ऑफ मीडिया राज्य उत्कृष्ट तालुकाध्यक्ष अवॉर्ड विनोद निला यांना जाहीर

लातूर : व्हॉईस ऑफ मीडिया राज्य उत्कृष्ट तालुकाध्यक्ष अवॉर्ड मराठवाड्यातुन चाकूर तालुकाध्यक्ष ॲड. विनोद गणपतराव निला यांना जाहीर करण्यात आला आहे. सदरील पुरस्काराचे मुंबई येथे वाय.बी चव्हाण सेंटर मुंबई येथे २६ फेब्रुवारी२०२४ रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत वितरण होणार आहे.व्हॉईस ऑफ मीडियाचे सन २०२३चे राज्य उत्कृष्ट पदाधिकारी अवॉर्ड,पॉझिटिव्ह जनालिझम अवॉर्ड,महाराष्ट्र भूषण अवॉर्ड जाहीर करण्यात आले आहेत. राज्य उत्कृष्ट पदाधिकारी अवॉर्ड मराठवाड्यातुन लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुकाध्यक्ष ॲड.विनोद गणपतराव निला यांना जाहीर करण्यात आला आहे.यावेळी प्रत्येक विभागातून दोन सर्वोत्कृष्ट काम करणाऱ्या तालुक्यांना व्हॉईस ऑफ मीडिया सर्वोत्कृष्ट तालुका २०२३ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर राज्यातून एका विभागाला, एका जिल्ह्याला. आणि एका शहरालाही, व्हॉईस ऑफ मीडिया सर्वोत्कृष्ट २०२३ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे.सदरील पुरस्काराचे वितरण मुंबई येथे वाय.बी चव्हाण सेंटर येथे २६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.०० वा.विविध खात्याचे मंत्री, सामाजिक मान्यवर, मंत्रालयीन सचिव आदी मान्यवरांच्या उपस्थिती होणार आहे.या निवडीबद्दल ॲड.विनोद निला यांचे व्हाईस ऑफ मीडियाचे मराठवाडा अध्यक्ष विजय चोराडीया, मराठवाडा कार्याध्यक्ष बालाजी फड, ,जिल्हाध्यक्ष संगम कोटलवार,मराठवाडा कार्यवाहक बाळासाहेब जाधव,आदिनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## दयानंद विज्ञानमध्ये आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर

लातूर : येथील दयानंद विज्ञान



महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना,राष्ट्रीय सेवा योजना,युवती कल्याण मंडळ व भालचंद्र ब्लड बँक आणि डॉ.लाल पॅथॉलॉजी लॅब यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२१ फेब्रुवारी २०२४ रोजी आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते.या शिबिराचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या अध्यक्षस्थानी संपन्न झाले.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.सुनीता बजाज,एनसीसी कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी,रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.राहुल जाधव व डॉ.सुरज कोल्हे,युवती कल्याण मंडळ समन्वयक प्रा.शितल पाटील,डॉ.टी.एच.मुजावर,प्रा.नुजहत शेख,डॉ.आशिष पाटील,भालचंद्र ब्लड बँकेचे दिगंबर पवार,महेंद्र गंधोले,सुरेखा हजारे,रमाकांत सूर्यवंशी,संजय ठाकूर आणि डॉ.लाल पॅथॉलॉजीचे इरफान सय्यद,परवेज शेख,आशिक शेख तसेच महाविद्यालयातील डॉ.आण्णाराव चौगुले,डॉ.युवराज सारणीकर,डॉ.जमन अंगुलवार,डॉ.गजानन बने,डॉ.रामशेट्टी शेटकार, डॉ.अमोल ठोसर,दिलीप राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी रक्तदान करणे हे सर्वश्रेष्ठ दान असून रक्तदानामुळे अनेक जणांचे जीव वाचतात.अशा या रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी,स्वयंसेवक उस्फूर्तपणे सहभाग नोंदवतात.सामाजिक व राष्ट्रीय कार्यात विद्यार्थ्यांचा सहभाग हिरीरीने असतो,असे त्यांनी सांगितले तर प्रमुख पाहुणे डॉ.सुनीता बजाज यांनी उत्तम निरोगी आरोग्यासाठी मुलामुलींनी योग्य त्या वेळी आरोग्य तपासणी करणे अत्यंत आवश्यक असते,असे त्यांनी सांगितले. सदरील शिबिरात हिमोग्लोबिन,थायराइड,शुगर,युरिक सिड,शुगर,कोलेस्ट्रोल, कॅल्शियम,व्हिटॅमिन यासहित ९५ जणांची आरोग्य तपासणी तर ८१ जणांची रक्त तपासणी व १२ जणांनी रक्तदान केले.डॉ. आशिष पाटील यांनी मुलांचे आरोग्य तपासणी केली.या शिबिराच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांचेही प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळाले.याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी,एनएसएस प्रतिनिधी हेमंत जाधव,चैतन्य पवार,प्रज्वल जाजे आणि एनसीसी,एनएसएस,युवती कल्याण मंडळाच्या विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने उपस्थित होते.

## माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकरांच्या उपस्थितीत मराठा आरक्षणासाठीचे उपोषण सोडले

लातूर : मराठा समाजाला ओबीसून आरक्षण मिळावे या मागणीसाठी आंतरवली सराटी येथे मराठ्यांचा संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी आमरण उपोषण सुरू केलेले आहे. त्यांच्या समर्थनाथ कव्हा येथील अॅड.नारायणराव माने कव्हेकर यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. त्यांच्या उपोषणाच्या ११ व्या दिवशी मराठा आरक्षणाची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केल्यामुळे भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या उपस्थितीत त्यांना ज्यूस देऊन उपोषण सोडविण्यात आले.

यावेळी बोलताना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले, महाराष्ट्र शासनाने मराठा समाजाला टिकेल असे आरक्षण दिले. मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी समाजाला न्याय देण्याची भूमिका घेतली व १० टक्के आरक्षण दिले. राज्यात पूर्वीचे ५२ टक्के आरक्षण असून नवीन १० टक्के दिले आणि ते टिकविण्यासाठी शासन निश्चित प्रयत्न करेल असा विश्वासही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रेमप्रकाश माकोडे, एमएनएस बँकेचे संचालक सुभाषअप्पा सुलगुडले, उपसरपंच किशोर दादा घार, अशोक पाटील, विनोद पूरी, अमर पाटील, गोविंद खंडागळे, रसूल पठाण, तुकाराम घार, शिवाजी घार, आत्माराम घार, बापू कदम, मनोज खंडागळे, कृष्णा किनीकरण, निलेश वाले, दत्ता सारगे, संजय गरड, विजयकुमार पाटील,



अमोल होळकर, बाबूराव इरले, भागवत सूर्यवंशी, रवी होळकर, प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ.शेख, पर्यवेक्षक डॉ.स्वामी, हर्षवर्धन बोयणे, सौरभ माने यांच्यासह कव्हा ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**तामिळनाडूच्या धर्तीवर १० टक्के आरक्षण टिकविण्यासाठी शासन पाठपुरावा करेल**
**– माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकारने १० टक्के आरक्षणाची घोषणा केली आहे. बिहारमध्ये एकूण ७५ टक्के आरक्षणाची घोषणा तर तामिळनाडूमध्येही एकूण ६८ टक्केच आरक्षणाची घोषणा करण्यात आली. त्याच धर्तीवर महाराष्ट्रामध्येही पूर्वीचे ५२ टक्के आरक्षण आणि आता १० टक्के आरक्षण एकूण ६२ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय राज्य शासनाने जाहीर केला आहे. त्यामुळे तामिळनाडूच्या धर्तीवर महाराष्ट्रामध्ये वाढीव दिलेले १० टक्के आरक्षण टिकविण्यासाठी शासनाने पाठपुरावा करून कुणबीचे पुरावे असणार्या कुटुंबियांना कुणबी प्रमाणपत्राचे तत्काळ वाटप करावे असे मतही भाजपा नेते तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

## विद्यार्थी,प्राध्यापक व महाविद्यालयाच्या सांघिक प्रयत्नातून अधिकाधिक संशोधन घडावे - उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे

**दयानंद विज्ञान महाविद्यालयात वैज्ञानिक शांती स्वरूप भटनागर व हेनरिक डॅम यांची जयंती साजरी**

**लातूर – वैज्ञानिक दृष्टिकोन घडविण्याच्या दृष्टीने जैवतंत्रज्ञान विभागाचा उपक्रम अतिशय चांगला असून,त्यातून प्रेरणा घेऊन विद्यार्थी,प्राध्यापक व एकंदरित संपूर्ण महाविद्यालयात अधिकाधिक संशोधन घडावे,यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे.देशाची प्रगती तेथील संशोधनाचा दर्जा यावर अवलंबून असते तर दर्जेदार संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी क्षमता विकसित कराव्यात,असे प्रतिपादन दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी केले.**

दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२१ फेब्रूवारी २०२४ रोजी जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने वैज्ञानिक 'शांती स्वरूप भटनागर' यांची १३० वी व हेनरिक डॅम यांची १२९ वी जयंती साजरी करण्यात आली.उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.कोमल गोमारे यांनी कार्यक्रमाची सुरुवात



वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.कार्यक्रमावेळी महाविद्यालयातील गणित विभागाचे विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते.

वैज्ञानिक शांती स्वरूप भटनागर यांची विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील कारकीर्द बी.एस्सी.बी.टी द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी ज्ञानेश्वरी वंजारे यांनी तर हेनरिक डॅम यांची माहिती बी.एस्सी.बी.टी.प्रथम वर्षाची विद्यार्थीनी रोहिणी माने यांनी प्रकाशझोतात आणली.

सर शांती स्वरूप भटनागर हे भारतीय कोलॉइड रसायनशास्त्रज्ञ,शैक्षणिक आणि वैज्ञानिक प्रशासक होते.वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे पहिले महासंचालक,ते भारतातील संशोधन प्रयोगशाळांचे जनक म्हणून आदरणीय आहेत.ते विद्यापीठ अनुदान आयोगाचे पहिले अध्यक्ष होते.

कार्ल पीटर हेन्रिक डॅम हे डॅनिश बायोकेमिस्ट आणि फिजिओलॉजिस्ट होते.१९४६ मध्ये स्टॉकहोममध्ये पत्नीसह डॅम

व्हिटॅमिन के शोधण्यात आणि मानवी शरीरशास्त्रातील त्याची भूमिका शोधण्यासाठी एडवर्ड डोइझी यांच्यासोबत संयुक्त कार्य केल्याबद्दल त्यांना १९४३ मध्ये वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात आले. धरणाच्या मुख्य प्रयोगात कोंबड्यांना कोलेस्टेरॉल मुक्त आहार देणे समाविष्ट होते.त्यांनी सुरुवातीला ओंटारियो ग्रिकल्चरल कॉलेज येथील शास्त्रज्ञांनी नोंदवलेल्या प्रयोगांची प्रतिकृती तयार केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमासाठी गणित विभागातील प्रा.ढगे, प्रा.भोसले, प्रा.चिद्रेवार,प्रा. पाटील तसेच वर्ग प्रतिनिधी पिंपरे योगिता,जैवतंत्रज्ञान विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. तसेच विद्यार्थ्यांच्या जैवतंत्रज्ञान मंचचे सदस्य प्रा.स्वरूप गावकरे व प्रा.श्रीनिवास कुलकर्णी आणि विद्यार्थी मंचचे पदाधिकारी विद्यार्थी तसेच विभागातील बी.एस्सी.प्रथम,द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

### नमो शेतकरी महासन्मान योजनेच्या दुसऱ्या हप्त्यापोटी १७९२ कोटी निधी वितरणास मान्यता

मुंबई : राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी राज्यातील सुमारे ९० लाख शेतकऱ्यांसाठी नमो शेतकरी महासन्मान योजनेच्या दुसऱ्या हप्त्यापोटी १ हजार ७९२ कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला असून लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर हा निधी वितरित करण्यासाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

## राजीव गांधी चौकात ऑटोरिक्षा चालक सेनेच्या नामफालकाचे थाटात अनावरण

लातूर : लातूर शहरातील राजीव गांधी चौकात हिंदवी स्वराज्य



संस्थापक राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त तमनप्पा रामपुरे यांच्या हस्ते महाराष्ट्र ऑटोरिक्षा चालक सेनेच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र ऑटोरिक्षा चालक सेनेच्या नामफलकास महाराष्ट्र ऑटोरिक्षा चालक सेनेचे लातूर जिल्हा अध्यक्ष त्र्यंबक गुरुनाथ स्वामी यांच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले.

त्या प्रसंगी महाराष्ट्र ऑटोरिक्षा चालक सेनेचे लातूर उपाध्यक्ष विनोद मोरे, सचिव बंडुसिंग भाट व सर्व रिक्षा चालक उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्र ऑटोरिक्षा चालक सेनेच्या राजीव गांधीं चौक शाखाध्यक्षपदी – महादेव देशमुख, उपाध्यक्षपदी नवनाथ कावीले व दयानंद बनसोडे, कोशाध्यक्षपदी महादेव गीरी, सचिवपदी राहुल कांबळे, सहसचिवपदी बलभीम सुर्यवंशी, कार्याध्यक्षपदी विशाल जाधव, सह कार्याध्यक्षपदी नवनाथ सुळ सल्लागारपदी सागर काळे, सह सल्लागारपदी अशोक हजारे यांची निवड करण्यात आली.

## शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

लातूर, – येथील शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये रॉयल



एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

अध्यक्षस्थानी प्राचार्य एल. टी. पुरी होते. यावेळी मुख्य समन्वयिका अनघा पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख दर्शना देशमुख, स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख रोहित जाधव उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थी विविध महापुरुषांच्या वेशभूषेत उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांचे गीत, पोवाडे गायले तर काही विद्यार्थिनींनी नृत्यातून पाळणा सादर केला. विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धेतही सहभाग नोंदवला. यावेळी लिंबराज गायकवाड, रोहिणी कदम व रोहित जाधव या शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य पुरी यांनी विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांचे विचार आत्मसात करण्याचे आवाहन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना शिवचरित्रातील अनेक घटना व प्रसंग सांगितले.यानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेत गौरवी धाराशिवे प्रथम, गौरवी शिंदे द्वितीय व आनंदी टमके तृतीय आली. चित्रकला स्पर्धेत कार्तिकी जाधव, विराज जाधव, वेदांती औरादे, पार्थ सुतार, तनिष्का हंचाटे, ऐश्वर्या कोरे, मयुर महामुनी, श्रुती केंद्रे यांनी पारितोषिक पटकावले.

पोवाडा गायनात अर्णव घोगरे, श्रीकांत चाकोते व भक्ती मिसे यांना बक्षीस मिळाले तर कराटे स्पर्धेत तनिष्का हंचाटे प्रथम हिने क्रमांक पटकावला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शीतल नडगिरे तर प्रास्ताविक ललिता दरेकर यांनी केले. आभार अनिता रायमल यांनी मानले. यावेळी प्राचार्य पुरी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्यने उपस्थित होते.

## काल्याच्या कीर्तनाच्या वेळी जनसागर उसळला, खा. सुधाकर शृंगारे यांनी कथास्थळी येऊन घेतले बाबांचे दर्शन

लातूर (वृत्तसेवा)– वारकरी संप्रदायाच्या नियमानुसार कथा, अखंड हरिनाम सप्ताहा नंतर काल्याचे कीर्तन होत असते .श्री श्री अष्टोत्तर शत कुंडात्मक अतिरुद्र महायाग एवं श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञाची काल सांगता झाली असली तरी बाबांच्या काल्याच्या कीर्तनाने या सत्संगाची खऱ्या अर्थाने सांगता आज झाली असे म्हणावे लागेल .यावेळी कथा मंडपात जनसागर उसळला होता यावेळी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

लातूर नगरीतील राजीव गांधी चौकातील पंचमुखी हनुमान मंदिर परिसरात पाच एकर जागेमध्ये उभा करण्यात आलेल्या भव्य कथा मंडपामध्ये आज पूजनीय बाबांचे काल्याचे कीर्तन झाले .यावेळी अलोट गर्दी उसळली होती .यावेळी श्री श्री राधाकृष्ण सत्संग समितीच्या वतीने बाबांचा यथोचित सत्कार करण्यात आला. समितीचे अध्यक्ष हरिप्रसाद मंत्री, सचिव संजय बोरा ,तसेच नाथसिंह देशमुख ,राजेश्वर बुके ,चंद्रकांत बिराजदार ,अॅड. प्रदीप मोरे ,मनीष आकनगिरे आदींनी बाबांचा पुष्पहार घालून सत्कार केला .

यावेळी बाबांनी ' याल तरी यारे यारे.. अवघे माझ्या मागे मागे,..आधी देतो पोटभरी पुरे म्हणाल तोवरी हळू हळू चला.. कोणी कोणाशी न बोला आधी देतो पोटभरी पुरे म्हणाल तोवरी ' या तुकाराम महाराजांचा अभंग घेत पूजनीय विद्यानंदजी सागर बाबा यांनी काल्याचे कीर्तन केले. अत्यंत मांगल्यपूर्ण वातावरणात अष्टोत्तर शत कुंडात्मक अतिरुद्र महायाग आणि श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाची सांगता झाल्यानंतर ज्याप्रमाणे कथेला दिवसागणिक गर्दी उसळली होती ;तशीच गर्दी बाबांच्या आजच्या काल्याच्या कीर्तनाला देखील उसळली होती . यामध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. संत तुकाराम महाराज यांनी ४०० वर्षांपूर्वी लिहिलेल्या या अभंगाची सत्यता





आजही आपल्याला पाहावयास मिळते .आपण धन कमावण्याच्या मागे लागून धर्माला विसरत चाललेलो आहोत धन जरूर कमवा; परंतु एका विशिष्ट कालावधी पर्यंत आपण थांबायला हवे .धन कमवता कमवता आपण भौतिकतेला ,वासनेला बळी पडत चाललेला आहोत कोणाला पोटाची भूक आहे तर ,कोणाला धनाची भूक आहे, तर कोणाला वासनेची भूक आहे.धन कितीही कमवले , तरी आपण असंतुष्ट राहतो. विशिष्ट कालावधीत मध्ये आपण समाधानी राहायला शिकले पाहिजे .संसारामध्ये जास्त काळ रमायचे की पारमार्थिक सुख घ्यायचे हे आपण सुरुवातीला ठरवायला हवे. परमार्थामध्ये शुद्ध –सात्विक तत्त्वज्ञान दिलेले आहे. आणि पारमार्थ मधून खऱ्या अर्थाने आपल्याला आनंद मिळतो. हा आनंद आत्मिक असतो. भजन करणे ही आत्म सुखाची एक प्रमुख स्थिती असते; परंतु आपण धर्माच्या नावाने ,कथेच्या नावाने, कीर्तनाच्या नावाने व्यापार मांडलेला आहे. धर्माची दुकानदारी आपण चालवली आहे. धर्माचा व्यापार आपण बनवून टाकलेला आहे. पाखंडी माणसांनी धर्माचा बाजार केल्यामुळे धर्मक्षेत्रामध्ये काही गैरप्रकार निर्माण झालेले आहेत. भजनामध्ये ,कीर्तनामध्ये, कथेमध्ये आपण दुकानदारी चालवलेली आहे. हा भाग वेगळा असला तरी ज्ञान हे विकण्याचे साधन नाही. धार्मिक बनायचे असेल तर बाह्य रंगाचे वस्त्र टाकून द्या .भक्ती तुम्हाला करायची असेल तर पाखंड, ढोंग याचा त्याग करा .अध्यात्माचा बाजार म्हणून आपण परमार्थ करायला लागलो तर ते चुकीचे आहे. विद्वान तुम्हाला बनायचे असेल तर ज्ञानोबा तुकोबा रायासारखे विद्वान बना , धर्माचे पालन करायचे असेल तर पाखंडाचा त्याग करावा लागेल ,असा हितोपदेशही बाबांनी काल्याच्या कीर्तनामध्ये केला. या देशाला गणवेशाची गरज नाही तर गुणवेशाची गरज आहे. संत बनण्यासाठी आपण प्रयत्न करतो परंतु चांगला माणूस बनण्यासाठी प्रयत्न करीत नाही. चांगला माणूस बनण्यासाठी गणवेशाची नव्हे तर गुणवेशाची गरज धर्म. हे बळजबरीने करण्याची गोष्ट नाही. प्रसन्नतेसाठी ,आत्मिक आनंद मिळण्यासाठी धर्म करा. अध्यात्म हे ध्येय असेल तर तुम्हाला योग्य रस्ता सापडेल. याप्रसंगी बाबांनी म्हटलेल्या 'विठ्ठल माझा माझा माझा मी विठ्ठलाचा..' या भजनावर उपस्थित मंडपातील साधू- संतांसह, स्त्री–पुरुष भाविकांनी नृत्याचा फेर धरला बाबांना देखील या नृत्यांमध्ये सहभागी होण्याचा मोह आवरता आला नाही. यावेळी असंख्य स्त्री–पुरुष भाविकांनी त्याचा आनंद लुटत भक्ती सागरात डुबून जाण्याचा अनुभव घेतला. लातूरचे खासदार सुधाकर शृंगारे यांनी पूजनीय बाबांचे कथास्थळी येऊन दर्शन घेतले.

## कैं. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे बारावी परीक्षार्थींचे स्वागत

बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव संचलित



कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे बारावी बोर्ड परीक्षेस उत्साहात प्रारंभ झाला. परीक्षा केंद्रावर एकूण ५३२ विद्यार्थी परीक्षा देत आहेत. परीक्षा केंद्रावर विज्ञान, कला, वाणिज्य आणि किमान कौशल्य अशा अभ्यासक्रमाच्या परीक्षा संपन्न होत आहेत. पहिल्याच दिवशी बोर्डाने इंग्रजी विषयाचा पेपर ठेवल्यामुळे विद्यार्थ्यासोबत पालकांचीही परीक्षा केंद्रावर गर्दी होती.

परीक्षार्थी म्हणून आलेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, केंद्रप्रमुख प्रा. हरिहर गायके, सह केंद्रप्रमुख प्रा.सोपान डोपे, हनुमंत शिंदे, संतोष कल्याणकर यांनी गुलाब पुष्प देऊन स्वागत आणि परीक्षे करीता शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रा. सुरेश बिराजदार, डॉ कांतराव पोले, डॉ.महावीर कटके, प्रा. संदिपान चेवले, डॉ. शाहूराज मुळे, डॉ. दशरथ भिसे यांची उपस्थिती होती. परीक्षा यशस्वी करण्यासाठी वसंत मस्के, प्रकाश मेहकर, राजकुमार कांबळे, विठ्ठल मुळे, अंकुश थरकर, दत्ता फुलगामे, बालाजी देशमुख, नितीन पाटील तसेच लातूर ग्रामीणचे पोलीस कर्मचारी हे काम पाहत आहेत.

## मुळशी धरणाची उंची वाढविण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

मुंबई, :– मुळशी धरणाखालील मुळशी परिसरातील गावांसह पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) क्षेत्रातील पश्चिम भागात वाढत असणाऱ्या लोकसंख्येसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होणे गरजेचे आहे. यादृष्टीने पुढील ३० वर्षांचा विचार करून मुळशी धरणाची उंची वाढवावी. तसेच मुळशी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या टप्पा १ व २ च्या माध्यमातून होणाऱ्या कामांसाठी टाटा पॉवर कंपनीबरोबर सामंजस्याने उपाययोजनांवर अंमलबजावणी करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी दिले. उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयातील त्यांच्या दालनात मुळशी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना टप्पा एक व टप्पा दोन मधील अडचणी दूर करण्यासाठी बैठक झाली.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894